सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करणेबाबत.
श्री. शैलेंद्र नामदेव वाघ, लेखा अधिकारी.

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग,
शासन आदेश:-संलेको-२०२६/प्र.क्र.१४१/E-१७७६७२४/कोषा प्रशा -२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :-११ ऑगस्ट, २०२६.

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
12 AUG 2026
प्राप्त झाले सही.........

संदर्भ
१) संचालनालयाचे पत्र क्र. संलेवको/प्रशा-राप/का.६/स.प्र.का/श्री. शै. ना.वाघ/४.२६/५१४/०४१४/१९१५/ दि. ०७.०४.२०२६
२) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे शासन निर्णय क्र. राफल २०२५ / प्र. क्र. १७२ / ९ ओ (E-११८२०२९), दि.३.१०.२०२५
३) महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे यांचे आदेश जा. क्र. मराफओवम / आस्था / कामु / १६४१ / २०२५, दि.३१.१२.२०२५
४) सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे यांचे आदेश क्र. सहसंलेको / पुणे / आस्था - ३ / मविलेसे (राप) / प्रतिक्षाधीन / ०१ / २०२६/७८, दि.५.१.२०२६
५) वित्त विभाग, शासन आदेश क्र. संलेको २०२६ / प्र. क्र. १५ / कोषा. प्रशा २, दि.१३.२.२०२६
६) सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे यांचे आदेश क्र. सहसंलेको / पुणे / आस्था - ३ / मविलेसे (राप) / कार्यमुक्त श्री.शै. ना. वाघ / ०२/२०२६/५४५, दि.१६.०२.२०२६
७) विभागीय कृषि सहसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र जा. क्र. आस्था /अ-२/९६६/२०२६, दि.१६.०२.२०२६
८) सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे यांचे पत्र क्र. सहसंलेको / पुणे /आस्था - ३ / मविलेसे (राप) / श्री. वाघ / प्रति. ले. अ/०३/२०२६/८२३, दि.१०.३.२०२६

९५

-: **शासन आदेश** :-

संदर्भीय क्र. २ येथील शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे ही संस्था निरसित करण्यात आली. त्यामुळे महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकारी संवर्गातील श्री. शैलेंद्र नामदेव वाघ, लेखा अधिकारी, यांना संदर्भ क्र.३ येथील आदेशान्वये दि. ३१.१२.२०२५ (म.नं.) कार्यमुक्त करण्यात आले होते.

२. सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे यांचे दि.५.१.२०२६ रोजीचे आदेशान्वये श्री. शैलेंद्र नामदेव वाघ, प्रतिक्षाधीन लेखा अधिकारी यांना दि.१.१.२०२६ (म.पू.) रोजी सदर कार्यालयात पदस्थापनेच्या प्रतिक्षेत रुजू करुन घेण्यात आले व त्यांच्याकडे कोष निरीक्षण शाखेमध्ये महालेखापाल, संचालक व सहसंचालक यांच्या लेखापरीक्षणाच्या प्रलंबित परिच्छेदाचे निपटारा करणेबाबतचे कामकाज सोपविण्यात आले.

0|645|2026|2172
13.8.2026

३.	वित्त विभागाच्या दि.१३.२.२०२६ रोजीच्या आदेशान्वये पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असलेले श्री. शैलेंद्र नामदेव वाघ यांना लेखा अधिकारी, विभागीय कृषी सहसंचालक यांचे कार्यालय, पुणे या पदावर पदस्थापना देण्यात आली. त्यामुळे सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे यांचे दि.१६.२.२०२६ रोजीचे आदेशान्वये श्री. वाघ यांना सदर पदावर रुजू होण्यासाठी त्यांचे कार्यालयातून दि.१६.२.२०२६ (म.पू.) रोजी कार्यमुक्त करण्यात आले. विभागीय कृषि सहसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी दि.१६.२.२०२६ रोजीचे पत्रान्वये श्री. शैलेंद्र वाघ हे लेखा अधिकारी, विभागीय कृषी सहसंचालक यांचे कार्यालय, पुणे या पदावर दि.१६.२.२०२६ (म.पू.) रोजी हजर झाले असल्याचे कळविले आहे.

४.	श्री. वाघ यांना दि.०१.०१.२०२६ ते १५.०२.२०२६ पर्यंत म्हणजेच एकूण ४६ दिवस नियमित पदनियुक्तीचे आदेश मिळेपर्यंत पदस्थापनेशिवाय रहावे लागले आहे. यास्तव सदर कालावधी "कर्तव्य कालावधी" म्हणून नियमित करणे आवश्यक आहे. नियमित करावयाच्या कालावधीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| कालावधी | दिवस | शेरा |
|---|---|---|
| दि.०१.०१.२०२६ | १ दिवस | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे कार्यालयात (म.पू.) रोजी रूजू |
| दि.०२.०१.२०२६ | १ दिवस | नैमित्तीक रजा |
| दि.०३.०१.२०२६ ते २८.०१.२०२६ | २६ दिवस | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे कार्यालयात कार्यरत |
| दि.२९.०१.२०२६ | १ दिवस | नैमित्तीक रजा |
| दि.३०.०१.२०२६ ते ०५.०२.२०२६ | ७ दिवस | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे कार्यालयात कार्यरत |
| दि.०६.०२.२०२६ | १ दिवस | नैमित्तीक रजा |
| दि.०७.०२.२०२६ ते ०८.०२.२०२६ | २ दिवस | शनिवार व रविवारची साप्ताहिक सुट्टी |
| दि.०९.०२.२०२६ ते १५.०२.२०२६ | ७ दिवस | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे कार्यालयात कार्यरत (दि.१६.०२.२०२६ (म.पू.) रोजी कार्यमुक्त) |
| **एकूण** | **४६ दिवस** | |

५.	महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे यांनी दि.३१.१२.२०२५ रोजीचे आदेशान्वये श्री. शैलेंद्र नामदेव वाघ, लेखा अधिकारी यांना सदर कार्यालयातून कार्यमुक्त केल्यानंतर ते तात्काळ सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे कार्यालयात रूजू झाले व त्यांच्या सेवा उपयोगात आणल्या आहेत. त्यामुळे वित्त विभाग, शासन परिपत्रक दि.२०.०२.२००८ मधील तरतूदीनुसार श्री. वाघ यांना प्रतिक्षाधीन कालावधी अनुज्ञेय होतो.

६. शासन परिपत्रक दिनांक २०.०२.२००८ मधील सूचना तसेच, म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ मधील नियम क्र. ९ (१४) (फ) व ९ (१४) (जी) मधील तरतूदी विचारात घेता, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकारी संवर्गातील श्री. शैलेंद्र नामदेव वाघ यांचा दिनांक ०१.०१.२०२६ ते दिनांक १५.०२.२०२६ पर्यंत एकूण ४६ दिवसांचा सक्तीचा प्रतिक्षेचा कालावधी हा "कर्तव्य" कालावधी म्हणून नियमित करण्यात येत आहे.

७. सदर कालावधीतील वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता संचालनालयाने प्रस्तावित केल्याप्रमाणे सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अ.भ. भसारकर
११/८/२०२६

(अविनाश भसारकर)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति :-

१) महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,*
२) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
३) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
४) सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे,*
५) संबंधित अधिकाऱ्याचे सध्याचे कार्यालय प्रमुख,*
६) श्री. शैलेंद्र नामदेव वाघ, लेखा अधिकारी *
७) निवड नस्ती, कोषा प्रशा -२,

*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)